# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.02.2026** **वार- शनिवार**

---

**अधिकारी मराठी साहित्य**

पुणे महापालिका, यशदा आणि संवाद पुणे यांच्या वतीनं दुसरं राज्यस्तरीय शासकीय अधिकारी, मराठी साहित्य संमेलन पुण्यातल्या बालगंधर्व रंगमंदिरात आज आयोजित करण्यात आलं आहे. शासकीय भाषा सुधारण्यासाठी शासनानं समिती नियुक्त करावी, तसंच अधिकाऱ्यांनी, लिहिते व्हावे आणि लोकाभिमुखता जपावी असं संमेलनाचे अध्यक्ष महेश भागवत यांनी सांगितलं. ते संमेलनाच्या उद्‌घाटन सत्रात बोलत होते.

तेलंगण राज्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालक असलेले भागवत यावेळी बोलताना म्हणाले की अधिकाऱ्यांना माणसांना वाचण्याची संधी अधिक मिळते. भेटायला येणारी माणसे त्यांना खूप काही शिकवतात. अधिकारी तेच साहित्यात उतरवतात. त्यामुळे ते साहित्य अस्सल वास्तववादी ठरतं. अधिकाऱ्यांच्या लिखाणाचा लाभ समाजाला होतो.

मराठी तरुणांनी आयएएसमध्ये जावे यासाठी काम करत आहोत. मराठी विद्यार्थी आयएएस परिक्षेत देशात पहिल्या क्रमांकाने उत्तीण होत नाही याची खंत आहे. मराठी मुलांना स्पर्धा परीक्षेतील मुलाखतीचे बाळकडू द्यायला हवे, असेही भागवत म्हणाले.

**पुणे दंत अधिवेशन-२०२६'**

आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण उपचारपद्धती आणि महिलांच्या सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश देणारे 'पुणे दंत अधिवेशन-२०२६' उत्साहात पार पडले. नागरिकांना अधिक दर्जेदार आणि आधुनिक दंतसेवा उपलब्ध व्हावी, या उद्दिष्टाने इंडियन डेंटल असोसिएशनतर्फे आयोजित या अधिवेशनात ३५ वैज्ञानिक व्याख्याने, संशोधन स्पर्धा शोधनिबंध, भित्तीपत्रके आणि २३ प्रात्यक्षिक उपचार सादरीकरणे झाली. तसंच दंतवैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा, गायन, नृत्य आणि वेशभूषा सादरीकरण अशा स्पर्धा घेण्यात आल्या.

**सायबर सुरक्षा**

सायबर सुरक्षा हे प्रचंड वेगाने विस्तार होत असलेले व्यापक क्षेत्र असून या क्षेत्रात युवा पिढीसाठी मोठ्या प्रमाणावर नवीन रोजगार संधी उपलब्ध होत आहेत, अस प्रतिपादन ज्येष्ठ संगणकतज्ञ डॉ. दीपक शिकारपूर यांनी केले आहे. यशस्वी स्किल्स लिमिटेड, डिजिटल टास्क फोर्स आणि थिंक स्पार्क कन्सल्टन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सायबर सुरक्षितता, सायबर गुन्हे अन्वेषण आणि डिजिटल न्याय सहायक अभ्यासक्रमाचं उद्घाटन करताना ते बोलत होते.

युवा पिढीनं उज्वल भवितव्यासाठी केवळ पदवी शिक्षणावर अवलंबून न राहता शिक्षण घेत असतानाच, सायबर सुरक्षितता तंत्रज्ञानाच्या कौशल्य अभ्यासक्रमांचा अंगीकार करायला हवा तसेच जपानी भाषा अवगत करून जपानमध्ये मोठ्या संख्येने उपलब्ध असलेल्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यायला हवा, असंही शिकारपूर यांनी सांगितलं.

**प्रयोग शाळा**

राज्यातील महाविद्यालयांमध्ये इनोव्हेशन कौन्सिल लॅबची स्थापना करण्यात येईल, अशी घोषणा उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनी आज पुण्यात केली.

इनोव्हेशन फाउंडेशनच्या वतीने आयोजित इनोव्हेट यू टेकॅथॉनचं उद्घाटन करताना ते बोलत होते.
यंदाच्या टेकॅथॉनमध्ये ४५० संघाचे सतराशेपेक्षा जास्त स्पर्धक सहभागी झाले असून, ते पुढील २४ तास नावीन्यपूर्ण संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी काम करणार आहेत.

**<u>क्षेत्रीय कार्यालय</u>**
पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांनंतर प्रथमच झालेल्या महापालिका निवडणुकीनंतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दी बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली असून राज्य सरकारच्या निर्णयानुसार स्वीकृत नगरसेवकांची संख्या आता दहा झाली आहे.
सध्या १५ क्षेत्रीय कार्यालये असून नव्या हद्दवाढीमुळे त्यांचे पुनर्विभाजन होणार आहे. वाघोली, कात्रज, बाणेर-बालेवाडी आदी भागांतील सीमारेषा ठरवताना दैनंदिन सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

**<u>एफआरपी</u>**
शेतकऱ्यांना उशिराने दिलेल्या एफआरपीवर 15 टक्के व्याज साखर कारखान्यांना द्यावे लागेल, असा इशारा साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी दिला आहे.
राज्यातील यंदाच्या 2025-26 च्या हंगामात ज्या 45 साखर कारखान्यांनी, शेतकऱ्यांना उसाच्या रास्त आणि किफायतशीर किंमत अर्थात एफआरपीची 60 टक्के कमी रक्कम दिली आहे, अशा कारखान्यांच्या सुनावण्या साखर आयुक्तालयात 17 आणि 18 फेब्रुवारीला झाल्या. त्या वेळी आयुक्तांनी ही भूमिका स्पष्ट केली.
दरम्यान आयुक्तालयानं थकीत एफआरपी प्रश्नी बाजू मांडण्याच्या नोटिसा बजावताच, काही कारखान्यांनी रक्कम दिल्याचे स्पष्ट केलं आहे.

**<u>पाणी पुरवठा</u>**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत येत्या सोमवारी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.
सेक्टर २३ मधील तसेच क्षेत्रीय स्तरावरील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील स्थापत्य आणि विद्युत-विषयक देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार असून या कामांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित आणि कमी दाबाने होण्याची शक्यता आहे.

**<u>हवामान</u>**
पुणे आणि परिसरात आज कमाल ३३ तर किमान १७ अंश सेलसियस तपमानची नोंद करण्यात आली. उद्या आकाश निरभ्र राहण्याचा वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता , ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**